<u>नियमित फौजदारी खटला/**198/2021**</u>

**महाराष्ट्र शासन वि. गोविंद बळीराम तिर्थे व इतर**

**MHLA090027782021**

<u>**निशाणी क्र.०१ खालील आदेश**</u>

आरोपी क्र.१ व २ यांनी फिर्यादी यांच्यासोबत नि.क्र.२१, २२ वर अर्ज व पुरसिस दाखल करून तडजोड केली. जवळचे नातेसंबंध फिर्यादी व आरोपी यांच्यात असल्याने भा.द.वी., कलम ३२५, ३२३, ५०६ सह ३४ प्रमाणे असणारे दोषारोप तडजोड होऊन निकाली करण्यात आले. तडजोडीद्वारे निकाली करण्यात आलेले दोषारोप फौ.प्र.सं.कलम ३२०(२) प्रमाणे मंजूर झाल्याने आरोपी क्र.१ व २ यांना भा.द.वी., कलम ३२५,३२३,५०६, च्या दोषारोपातून निर्दोष म्हणून सोडून देण्यात आले.

आरोपी क्र.१ व २ यांच्या विरुद्ध २९४ अंतर्गत असणारा दोषारोप प्रलंबित राहिल्याबाबत त्यांनी नि.क्र.३१ वर अर्ज सादर केला. आरोपी यांनी गुन्हा कबुल केल्याने फौ.प्र.सं.,कलम २५२ प्रमाणे भा.द.वी.कलम २९४ च्या गुन्ह्यासाठी आरोपी क्र.१ व २ यांना प्रत्येकी रक्कम रु.२००/– दंड अशी शिक्षा करण्यात येते. दंड न भरल्यास ०८ दिवस साधी कैद. याप्रमाणे केस निकाली काढण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.07.08 16:37:35 +0530

**ठिकाणः उदगीर** **(श्री. व्ही. आर. घराळ)**

**दि.०८/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उदगीर.**